# प्रेसनोट

दिनांक १६/१२/२०२५

## ॲन्टी करप्शन विभाग, नवी मुंबई यांची यशस्वी सापळा कारवाई

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| २. | ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक . | :- | सीबीडी पोलीस ठाणे, जि.रायगड, ठाणे दैनंदिनी नोंद क्रमांक ४९/२०२५ वेळ २१:५८, दिनांक १६/१२/२०२५ |
| ३ | लोकसेवकाचे नाव व कार्यालय | | १) दिलीप तुळशीराम बागुले वय ५५ वर्षे, उप अधीक्षक भुमी अभिलेख (वर्ग २) उप अधीक्षक, भुमी अभिलेख (नैना) रा. श्रीविनायक को.ऑप.हौसींग सोसायटी, श्रेणीनगर बदलापुर पश्चिम<br>२) कलिमोद्दीन रियाजोद्दीन शेख वय २७ वर्षे, निमतानदार (वर्ग ३) भुमी अभिलेख (नैना) रा. डायमंड अर्पाटमेंट प्लॉट नं. १२ बी, सेक्टर २४ कामोठे नवी मुंबई |
| ४. | लाचेची मागणी रक्कम | :- | रु. ६,००,०००/- |
| ५ | स्विकारलेली रक्कम | :- | रु. ६,००,०००/- त्यामध्ये रूपये २,००,०००/- रक्कमेच्या ४०० भारतीय चलनी नोटा तसेच ४,००,०००/- किमतीच्या ८०० रंगीत बनावट नोटा. |
| ६ | थोडक्यात हकिगत | :- | यातील तक्रारदार यांनी दि. १५/१२/२०२५ रोजी लाप्रवि, नवी मुंबई कार्यालय येथे समक्ष तक्रार दिली की, यातील तक्रारदार हे विकासक यांच्याकडे गेले ०३ वर्षापासून काम करतात. विकासक यांनी नवी मुंबई इंटरनॅशल एअरपोर्ट इन्फुलन्स एरिया (नैना) येथे टिपीएस क्र. १ मध्ये भुखंड क्र. २७ खरेदी केला असून सदर खरेदी केलेल्या भुखंडाच्या मोजणी व इतर प्रशासकीय कामाच्या अनुषंगाने अर्ज व इतर आर्थिक व्यवहारासंबधी काम पाहण्याबाबतचे तक्रारदार यांना अधिकारपत्र दिले. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी सदरचा भुखंड मोजणीसाठी विकासक यांचे नावे अर्ज घेवून सदरचा अर्ज मा. जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख यांचे कार्यालयात जमा केला. त्यानंतर सदर अर्जावरून जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख (नैना) कार्यालयाकडुन दिनांक २८/११/२०२५ रोजी विकासक यांचे नावे नोटीस देवून सदरचा भुखंड दिनांक ०३/१२/०२५ रोजी मोजणीसाठी ठेवला असल्याबाबत कळविले होते. विकासक यांनी तक्रारदार यांना दिलेल्या अधिकाराप्रमाणे सदर भुखंडाच्या मोजणीसंदर्भात कामासाठी तक्रारदार यांनी यातील लोकसेवक निमतानदार श्री.के.आर.शेख यांचेशी केलेल्या संपर्काप्रमाणे त्यांनी दिनांक ०५/१२/२०२५ रोजी भुखंड क्र. २७ ची मोजणी केली.<br>भुखंडाची मोजणी केल्यानंतर मोजणीचे रिपोर्ट घेण्यासाठी लोकसेवक निमतानदार श्री.के.आर.शेख यांनी तक्रारदार यांच्याशी संपर्क साधुन मोजणीचे 'क पत्र' देण्यासाठी तक्रारदार यांची उप अधिक्षक भुमी अभिलेख श्री. बागुले यांच्याशी भेट घडवुन आणली असता त्यावेळी झालेल्या चर्चेमध्ये उप अधिक्षक भुमी अभिलेख श्री. बागुले यांनी मोजणीचे 'क पत्र' देण्यासाठी तक्रारदार यांच्याकडे रूपये दोन लाख रक्कमेची मागणी केली असलेबाबत तकारदार यांनी दिनांक १५/१२/२०२५ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई कार्यालयात समक्ष हजर राहुन तक्रार दिली होती. सदर तक्रारअर्जाच्या अनुषंगाने दिनांक १५/१२/२०२५ रोजी केलेल्या लाचेच्या सत्यता पडताळणीमध्ये उप अधिक्षक भुमी अभिलेख श्री. बागुले यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रथम रू. ९,००,०००/- लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. ६,००,०००/- लाचेची मागणी केली. सदरवेळी लाच मागणी दरम्यान लोकसेवक निमतानदार श्री.के.आर शेख यांनी लाच देण्यासाठी तक्रारदार यांना प्रोत्साहन दिले. त्यानंतर आज दिनांक १६/१२/२०२५ रोजी लाच मागणीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक शेख यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम रू. ६,००,०००/- तक्रारदार यांचे वाहनामध्ये स्विकारल्यानंतर त्यांना पंचासमक्ष रंगेहाथ पकडण्यात आलेले आहे. तसेच लोकसेवक उप अधिक्षक भुमी अभिलेख श्री. बागुले यांना ताब्यात घेण्यात आले असून दोन्ही लोकसेवक यांच्याविरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्याची कारवाई सुरु आहे. |

लाचलुचपत प्रतिबंध विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंध कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

मार्गदर्शन अधिकारी:-मा.श्री. शिवराज पाटील,पोलीस अधीक्षक ,ॲन्टी करप्शन ब्युरो,ठाणे परिक्षेत्र,ठाणे
मा. श्री. भागवत सोनवणे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
मा.श्री. सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

संपर्क पत्ता :-ला.प्र.वि. नवी मुंबई मध्यवर्ती सुविधा इमारत फळमार्केट, तुर्भे, से.न.१९, एपीएमसी
नवी मुंबई, ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१

**संकेत स्थळ :—acbmaharashtra@mahapolice.gov.in**
ई—मेल :— **spacbthane@mahapolice.gov.in,**
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन **:—acbmaharashtra.net**
टोलफ्रीनं. :—१०६४ दुरध्वनी क्र. :—०२२—२०८१३५९८/२०८१३५९९
अेसीबी, नवी मुंबई कार्यालय दुरध्वनी क्र. —२७८३३३४४/८३५६८२६४०३

(धर्मराज सोनके)
पोलीस उप अधीक्षक,
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई.